Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
# जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। शनिवार, दि. १३ जून २०२६ । वर्ष १ । अंक ६८ । पाने २।
DIGITAL EDITION

कल्याणे होळमध्ये गुणवंत विद्यार्थी, अग्निवीरांचा सत्कार



(पान २ वर)

## » Selected

### गोळीबार प्रकरणातील आरोपींना डीसीपी झेंडे यांचा पोलिसी खाक्या

कल्याण : कल्याण पूर्व भागात बुधवारी रात्री दोन प्रतिस्पर्धी टोळ्यांमधील किरकोळ वादाचे रूपांतर भीषण गोळीबारात झाल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. या गोळीबारात एक निष्पाप वाटसरू गोळी लागून गंभीर जखमी झाल्याची घटना घडली असून, पोलिसांनी तातडीने कारवाई करत अवघ्या काही तासांत चार संशयितांना ताब्यात घेतले आहे.घटनेची माहिती मिळताच पोलीस उपायुक्त (डीसीपी) अतुल झेंडे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेत परिस्थितीचा आढावा घेतला. त्यानंतर पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक माहिती आणि गुप्त सूत्रांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे मध्यरात्री विशेष कोम्बिंग ऑपरेशन राबवले.

## विधानसभा निवडणूकः नाशिकचा तिढा सुटला; जळगावातही महायुतीचा मार्ग मोकळा?

# फडणवीस ,शिंदेंच्या हस्तक्षेपामुळे महायुतीचा मार्ग मोकळा!

## गुलाबराव पाटील जळगावात दाखल • नंदकुमार महाजन यांच्या विजयाचा मार्ग सुकर होण्याची चिन्हे

**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव-नाशिक : स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नाशिकमधील महायुतीतील बंडखोरी अखेर निवळली असून आता जळगावातील राजकीय पेचही सुटण्याच्या मार्गावर असल्याची चिन्हे दिसू लागली आहेत.**

- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या हस्तक्षेपानंतर नाशिकमध्ये बंडखोरांची माघार
- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या भेटीनंतर जळगावातील राजकीय घडामोडींना वेग
- प्रसाद हिरे आणि गोकुळ गिते यांनी घेतली माघार, रेश्मा काळेंनी घेतली एकनाथ शिंदेंची भेट





मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्तक्षेपानंतर आणि मंत्री गिरीश महाजन, उदय सामंत तसेच दादा भुसे यांच्या समन्वयातून भाजपचे बंडखोर प्रसाद हिरे आणि अपक्ष गोकुळ गिते यांनी माघार घेतल्याने नाशिकमधील महायुतीचा मार्ग मोकळा झाला आहे.दरम्यान, जळगावातील बंडखोर उमेदवार रेश्मा काळे यांनी शुक्रवारी मुंबईत जाऊन उपमुख्यमंत्री तथा शिवसेना प्रमुख एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. या भेटीनंतर महायुतीच्या अधिकृत उमेदवाराला पाठिंबा देण्याबाबत त्यांना पक्षश्रेष्ठींकडून निर्देश मिळाल्याची माहिती राजकीय सूत्रांकडून समोर येत आहे. त्यामुळे शनिवारी जळगावात त्या अधिकृत भूमिका जाहीर करून महायुतीला पाठिंबा देतील, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे, जळगावात महायुतीच्या आमदारांची पाठिंब्याबाबत तातडीची बैठक आयोजित करण्यात आली होती. मात्र, ज्यांचा पाठिंबा मिळवणे महत्त्वाचे मानले जात होते त्या रेश्मा काळे यांना या बैठकीबाबत अधिकृत निमंत्रण किंवा माहिती देण्यात आली नसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली. शिवसेनेचे नेते आणि जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील हे त्यावेळी मुंबईत असल्याने बैठक अल्पावधीत आटोपून पुढील चर्चा शनिवारी करण्याचा निर्णय घेण्यात आला. याच काळात रेश्मा काळे यांनी थेट मुंबई गाठत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतल्याने स्थानिक राजकारणाला नवे वळण मिळाले. या भेटीची माहिती स्थानिक महायुतीतील अनेक नेत्यांनाही नसल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे निर्णय प्रक्रियेत पक्षश्रेष्ठींचा थेट हस्तक्षेप झाल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनंतर पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी रेश्मा काळे यांच्याशी संवाद साधून माघारीबाबत अंतिम चर्चा करण्यासाठी जळगावात तातडीने दाखल होण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे महायुतीतील अंतर्गत मतभेद दूर करण्यासाठी वरिष्ठ पातळीवर प्रयत्न वेगाने सुरू असल्याचे चित्र आहे.

### रेश्मा काळे यांच्या भूमिकेकडे लागले लक्ष

जर रेश्मा काळे यांनी अधिकृतपणे उमेदवारी मागे घेत महायुतीला पाठिंबा जाहीर केला, तर भाजपचे उमेदवार नंदकुमार महाजन यांच्या विजयाचा मार्ग मोठ्या प्रमाणात सुकर होणार असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे. आता सर्वांचे लक्ष रेश्मा काळे यांच्या अंतिम भूमिकेकडे लागले असून, जळगावातील विधान परिषद निवडणुकीच्या राजकीय समीकरणांवर त्याचा निर्णायक परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

---

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

# शेतकऱ्यांचा शिंदखेडा तहसील कार्यालयावर बैलगाडी मोर्चा!

## पीकविमा रक्कम तातडीने देण्याची मागणी

**जन सम्राट टाईम्स**



**शिंदखेडा | प्रतिनिधी:** शिंदखेडा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते महेंद्र पाटील यांच्या नेतृत्वाखाली शुक्रवारी तहसील कार्यालयावर भव्य बैलगाडी मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात तालुक्यातील शेकडो शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मोर्चादरम्यान शेतकऱ्यांनी बैलगाड्यांसह तहसील कार्यालयावर धडक देत आपल्या मागण्यांचा जोरदार आवाज बुलंद केला. विशेषतः खरीप २०२५ अंतर्गत पात्र शेतकऱ्यांची प्रलंबित पीकविमा रक्कम तात्काळ वितरित करण्यात यावी, तसेच शिंदखेडा तालुक्यातील पीक नोंदणी, पंचनामे आणि संरक्षण प्रक्रियेची सखोल चौकशी करण्यात यावी, अशा प्रमुख मागण्या यावेळी करण्यात आल्या. शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे निवेदन सादर करत पीकविमा वितरणातील विलंबामुळे आर्थिक संकट अधिक गडद होत असल्याचे सांगितले. वेळेत नुकसानभरपाई न मिळाल्याने शेतीचा खर्च भागविणे कठीण होत असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. मोर्चादरम्यान तहसीलदारांनी शेतकरी प्रतिनिधींशी चर्चा करून त्यांच्या मागण्या ऐकून घेतल्या. यावेळी त्यांनी संबंधित विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना धारेवर धरत प्रलंबित प्रकरणांची तातडीने पूर्तता करण्याचे निर्देश दिले. पुढील काही दिवसांत पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर विमा रक्कम जमा करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे आदेशही त्यांनी दिल्याची माहिती समोर आली.

### मागण्या पूर्ण न झाल्यास आंदोलनचा इशारा

प्रशासनाच्या आश्वासनानंतर शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले असले तरी दिलेल्या मुदतीत मागण्या पूर्ण न झाल्यास आणखी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी शेतकरी नेत्यांनी दिला.शेतकरी प्रतिनिधींशी चर्चा करून त्यांच्या मागण्या ऐकून घेतल्या. यावेळी त्यांनी संबंधित विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना धारेवर धरत प्रलंबित प्रकरणांची तातडीने पूर्तता करण्याचे निर्देश दिले.

---

# रिपब्लिकन ख्रिश्चन आघाडीच्या पुणे शहर अध्यक्षपदी ख्रिस्तोफर राजमनी यांची नियुक्ती

## रामदास आठवले यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान; पुणे शहरातील विविध पदाधिकाऱ्यांचीही घोषणा

**जन सम्राट टाईम्स**




**पुणे | प्रतिनिधी:** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (आरपीआय) सामाजिक न्यायाच्या विचारधारेशी ख्रिश्चन समाजाला जोडण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या रिपब्लिकन ख्रिश्चन आघाडीच्या पुणे शहर अध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते ख्रिस्तोफर राजमनी यांची नियुक्ती करण्यात आली. रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी बोलताना केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले म्हणाले की, आरपीआयची संघटनात्मक ताकद आणि सामाजिक न्यायाची विचारधारा समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावी, यासाठी रिपब्लिकन ख्रिश्चन आघाडीची स्थापना करण्यात आली आहे. समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करणे हे पक्षाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमास आरपीआयचे प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, पुणे शहराध्यक्ष संजय सोनवणे, पुणे शहर उपमहापौर परशुराम वाडेकर, नगरसेविका इमानी कांबळे, महिपाल वाघमारे, शाम सदाफुले यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. याच प्रसंगी रिपब्लिकन ख्रिश्चन आघाडीच्या पुणे शहर कार्यकारिणीतील विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्याही जाहीर करण्यात आल्या. त्यामध्ये पुणे शहर महिला अध्यक्षपदी डार्थी रोड्रिक्स, पुणे शहर उपाध्यक्षपदी येशू दोरास्वामी, पुणे शहर सचिवपदी कॉलिन वॉल्श, पुणे कॅम्प विभाग अध्यक्षपदी विनोद चंडालिया, हडपसर विभाग अध्यक्षपदी फ्रान्सिस सांतामात्यि, सोलापूर बाजार प्रभाग शाखाध्यक्षपदी स्टेनली फ्रान्सिस नेथन, वानवडी शाखाध्यक्षपदी विनेश पिल्ले, घोरपडी-मुंढवा प्रभाग अध्यक्षपदी रॉकी अँथोनी आणि कोंढवा शाखाध्यक्षपदी राजन राजमनी तसेच वडगाव शेरी शाखाध्यक्षपदी रॉबर्ट दास यांची नियुक्ती करण्यात आली. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी ख्रिश्चन समाजातील विविध प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी तसेच सामाजिक ऐक्य आणि संघटन मजबूत करण्यासाठी कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

---

# केमिकलने भरलेला ट्रक उलटून भीषण आग

## शिरपूर–चोपडा महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा

**जन सम्राट टाईम्स**



**शिरपूर । प्रतिनिधी:** : शिरपूर–चोपडा महामार्गावरील सावर गावाजवळ केमिकलने भरलेला ट्रक उलटून त्याला भीषण आग लागल्याची घटना शनिवारी सकाळी घडली. काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केल्याने संपूर्ण ट्रक जळून खाक झाला. मात्र चालक आणि वाहक यांनी प्रसंगावधान राखत वेळीच ट्रकमधून उडी मारल्याने त्यांचा थोडक्यात जीव वाचला. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, चोपडा येथून शिरपूरच्या दिशेने केमिकलचा माल घेऊन ट्रक जात असताना सावर गावाजवळ अज्ञात वाहनाने दिलेल्या हुलकावणीमुळे चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. यानंतर ट्रक रस्त्याच्या कडेला उलटला आणि त्याला अचानक आग लागली. ट्रकमध्ये ज्वलनशील केमिकल असल्याने काही मिनिटांतच आगीने भीषण स्वरूप धारण केले. घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली. महामार्गावरून जाणाऱ्या वाहनचालकांनी तत्काळ आपली वाहने थांबवून सुरक्षित अंतर राखले. आगीमुळे शिरपूर–चोपडा महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली आणि दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. या दुर्घटनेत ट्रक पूर्णपणे जळून खाक झाला असून त्यावरील केमिकलच्या मालासह लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. घटनेची माहिती मिळताच थाळनेर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. अपघातग्रस्त ट्रक बाजूला करून महामार्गावरील वाहतूक पूर्ववत करण्यासाठी पोलिसांनी तत्काळ उपाययोजना केल्या. त्यामुळे काही वेळानंतर वाहतूक हळूहळू सुरळीत करण्यात आली. दरम्यान, नेमका अपघात कशामुळे झाला, अज्ञात वाहनाच्या हुलकावणीमुळेच ट्रक उलटला का, तसेच आगीचे नेमके कारण काय, याचा सखोल तपास थाळनेर पोलीस करत आहेत. घटनास्थळी मोठ्या प्रमाणावर नागरिकांची गर्दी झाल्याने पोलिसांना परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागले. या घटनेमुळे ज्वलनशील रसायने वाहून नेणाऱ्या वाहनांच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला असून, अशा वाहनांसाठी महामार्गांवर अधिक प्रभावी सुरक्षा उपाययोजना करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

---

# धुळेच्या आग्रा रोडवर वाहतूक कोंडी

## अधिकमास खरेदीसाठी नागरिकांची गर्दी

**जन सम्राट टाईम्स**



**धुळे | प्रतिनिधी :** अधिकमासानिमित्त खरेदीसाठी बाजारपेठेत नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केल्याने धुळे शहरातील प्रमुख व्यापारी केंद्र असलेल्या आग्रा रोड परिसरात सायंकाळच्या सुमारास प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण झाली. सराफ बाजारासह विविध व्यावसायिक आस्थापनांमध्ये ग्राहकांची वाढलेली वर्दळ आणि रस्त्यावर वाढलेली वाहनांची संख्या यामुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागला. शहरातील सर्वाधिक गजबजलेल्या भागांपैकी एक असलेल्या आग्रा रोडवर खरेदीसाठी आलेल्या महिला, कुटुंबे आणि इतर नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. त्यामुळे एकाच वेळी मोठ्या प्रमाणात वाहने रस्त्यावर आल्याने अनेक ठिकाणी वाहतूक संथ झाली आणि काही काळासाठी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. वाहतूक कोंडीमुळे दुचाकी आणि चारचाकी चालकांना अक्षरशः मार्ग काढत पुढे जावे लागले. अनेकांना आपल्या गंतव्यस्थानी पोहोचण्यासाठी अपेक्षेपेक्षा अधिक वेळ लागला. विशेषतः बाजारपेठेतील अरुंद भागात पादचारी आणि वाहनांची एकाचवेळी झालेली वर्दळ परिस्थिती अधिक गुंतागुंतीची बनवत असल्याचे चित्र दिसून आले. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या परिसरात बेशिस्त पार्किंग, रस्त्यावर उभ्या असलेल्या फेरीवाल्यांच्या हातगाड्या आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन ही समस्या कायम असून, त्यामुळे आग्रा रोडवर वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होत असते. अधिकमासाच्या पार्श्वभूमीवर वाढलेल्या खरेदीमुळे या समस्येची तीव्रता आणखी वाढल्याचे दिसून आले. व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे की, धार्मिक कारणांमुळे अधिकमासात सोने-चांदी, पूजासाहित्य तसेच इतर वस्तूंच्या खरेदीसाठी नागरिक मोठ्या संख्येने बाजारात येत आहेत. त्यामुळे बाजारपेठेत चैतन्य निर्माण झाले असले तरी वाहतूक व्यवस्थेवरील ताणही वाढला आहे. दरम्यान, आग्रा रोडवरील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी वाहतूक शाखेने अतिरिक्त मनुष्यबळ तैनात करून बेकायदा पार्किंगवर कारवाई करावी, फेरीवाल्यांचे नियोजन करावे आणि गर्दीच्या वेळेत विशेष वाहतूक नियोजन राबवावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### दीर्घकालीन उपाययोजना आखण्याची गरज

सण-उत्सव आणि विशेष धार्मिक कालावधीत बाजारपेठांमध्ये होणारी वाढती गर्दी लक्षात घेऊन प्रशासनाने दीर्घकालीन उपाययोजना आखण्याची गरज असल्याचे मतही शहरवासीयांनी व्यक्त केले आहे.वाहतूक कोंडीमुळे दुचाकी आणि चारचाकी चालकांना अक्षरशः मार्ग काढत पुढे जावे लागले. अनेकांना आपल्या गंतव्यस्थानी पोहोचण्यासाठी अपेक्षेपेक्षा अधिक वेळ लागला. विशेषतः बाजारपेठेतील अरुंद भागात पादचारी आणि वाहनांची एकाचवेळी झालेली वर्दळ परिस्थिती अधिक गुंतागुंतीची बनवत असल्याचे चित्र दिसून आले.


---

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज

# प्रोजेक्ट उन्नती-2 अंतर्गत 30 तासांचे समुपदेशन प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण

## महिला विद्यार्थिनींच्या कौशल्यविकासाला चालना; पर्सन-सेंटर्ड थेरपीद्वारे समुपदेशनाचे प्रशिक्षण

**जन सम्राट टाईम्स**



**मुंबई | प्रतिनिधी :** 'प्रोजेक्ट उन्नती-२'चा महत्त्वपूर्ण टप्पा पूर्ण मानसशास्त्राच्या पदव्युत्तर विद्यार्थिनींसाठी ३० तासांचे विशेष प्रशिक्षण • मानसिक आरोग्य क्षेत्रातील व्यावसायिक कौशल्यांचा विकास मुंबई (गुरुदत्त वाकदेकर) : सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटीच्या पुढाकारातून राबविण्यात येणाऱ्या 'प्रोजेक्ट उन्नती-२ : सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर स्किल डेव्हलपमेंट ऑफ वूमेन स्टुडंट्स' अंतर्गत श्रीमती मणिबेन एम.पी. शाह कला व वाणिज्य स्वायत्त महिला महाविद्यालय, माटुंगा येथील मानसशास्त्र विभागात ३० तासांचा 'पर्सन-सेंटर्ड थेरपी प्रशिक्षण कार्यक्रम' यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आला. समुपदेशन मानसशास्त्रात विशेषीकरण करणाऱ्या पदव्युत्तर विद्यार्थिनींसाठी आयोजित करण्यात आलेल्या या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश कार्ल रॉजर्स यांच्या मानवतावादी दृष्टिकोनावर आधारित प्रत्यक्ष समुपदेशन कौशल्यांचा विकास करणे हा होता. मानसिक आरोग्य क्षेत्रातील व्यावहारिक ज्ञान आणि व्यावसायिक क्षमता विकसित करण्यावर या उपक्रमात विशेष भर देण्यात आला. या प्रशिक्षणात 'सुख बाय एस. एच. एम.'च्या संस्थापिका श्वेता मंगनानी यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. कार्यक्रमामध्ये संवादात्मक व्याख्याने, अनुभवाधारित उपक्रम, भूमिकानाट्य, आत्मपरीक्षण सराव, केस स्टडीज तसेच पर्यवेक्षित प्रात्यक्षिक सत्रांचा समावेश करण्यात आला होता. त्यामुळे विद्यार्थिनींना केवळ सैद्धांतिक नव्हे, तर प्रत्यक्ष समुपदेशन प्रक्रियेचा अनुभवही मिळाला. हा उपक्रम रोटरी क्लब ऑफ मुंबई क्वीन्स नेकलेस तसेच दलाल अँड ब्रोचा स्टॉक ब्रोकिंग प्रायव्हेट लिमिटेड यांच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR) सहाय्याने राबविण्यात आला. 'उन्नती-१' नंतर मिळालेल्या सातत्यपूर्ण सहकार्यामुळे कौशल्यविकास कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविणे शक्य झाल्याचे आयोजकांनी नमूद केले.

या प्रशिक्षण मालिकेची संकल्पना महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अर्चना पत्की यांच्या मार्गदर्शनाखाली विकसित करण्यात आली. महिला विद्यार्थिनींसाठी कौशल्याधारित आणि अनुभवाधारित शिक्षणाला प्राधान्य देत त्यांना रोजगारक्षम बनविण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

### रोजगारक्षम शिक्षणाच्या दिशेने वाटचाल

प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थिनींना सहानुभूती, निरपेक्ष सकारात्मक स्वीकार, चिकित्सकीय संवाद, सक्रिय ऐकणे, आत्मजागरूकता, भावनिक बुद्धिमत्ता आणि नैतिक समुपदेशन प्रक्रिया यांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले. या माध्यमातून विद्यार्थिनींच्या व्यावसायिक कौशल्यांचा सर्वांगीण विकास झाला असून त्यांना समुपदेशन, मानसिक आरोग्य सेवा, शिक्षण, स्वयंसेवी संस्था, रुग्णालये तसेच पुनर्वसन केंद्रांमध्ये करिअर घडविण्यासाठी सक्षम पाया मिळाला आहे. या उपक्रमाचे आयोजन प्रकल्प संचालक प्रो. डॉ. माला पांडुरंग आणि समन्वयक दत्तात्रय गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. महिला विद्यार्थिनींना आधुनिक कौशल्यांनी सक्षम करून रोजगारक्षम शिक्षणाच्या दिशेने वाटचाल घडवून आणणारा हा उपक्रम 'प्रोजेक्ट उन्नती-२' अंतर्गत एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला असून, कौशल्य विकास आणि मानसिक आरोग्य क्षेत्रातील गुणवत्तापूर्ण प्रशिक्षणासाठी संस्थेच्या प्रयत्नांना यामुळे अधिक बळ मिळाले आहे.

# गावठाण जागेवादामुळे घरकुलापासून आदिवासी वंचित

## लिलाबाई भिल यांनाही घरकुलाचा लाभ नाही

- मासेमारी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह,
- प्रशासनाकडे तातडीच्या हस्तक्षेपाची मागणी
- ३० ते ३५ वर्षांपासून घरकुल योजनेपासून वंचित

जन सम्राट टाईम्स

**एरंडोल । प्रतिनिधी:** एरंडोल तालुक्यातील वरखेड गावात गावठाण जागेच्या वादामुळे अनुसूचित जाती-जमातीतील अनेक पात्र कुटुंबे वर्षानुवर्षे शासकीय घरकुल योजनेपासून वंचित राहिल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. विशेष म्हणजे, गावाच्या विकासाची धुरा पाच वर्षे सांभाळलेल्या तत्कालीन महिला सरपंच तथा सध्या ग्रामपंचायतीच्या प्रशासक म्हणून कार्यरत असलेल्या लिलाबाई बन्सीलाल भिल यांनाही आजपर्यंत स्वतःचे पक्के घर मिळाले नसून त्या आजही झोपडीत राहण्यास मजबूर आहेत.

भडगाव तालुक्यातील वरखेड ग्रामपंचायत हद्दीतील पिंपळगाव गावठाणाशी संबंधित जागेच्या वादामुळे येथील अनेक आदिवासी कुटुंबांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळू शकलेला नाही. पिण्याच्या पाण्याच्या सुविधेशिवाय इतर कोणत्याही विकास योजनांचा लाभ मिळत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

गेल्या ३० ते ३५ वर्षांपासून या भागात वास्तव्यास असलेल्या अनुसूचित जाती-जमातीच्या कुटुंबांनी घरकुल योजना, मूलभूत सुविधा आणि इतर शासकीय लाभांसाठी सातत्याने पाठपुरावा केला आहे. तत्कालीन सरपंच लिलाबाई भिल आणि तत्कालीन उपसरपंच जगदीश शिरसाठ यांनीही हा प्रश्न शासन दरबारी वारंवार मांडला. मात्र तालुका आणि जिल्हा प्रशासनाच्या स्तरावर अद्याप ठोस निर्णय न झाल्याने हा प्रश्न कायम प्रलंबित आहे. विशेष बाब म्हणजे, ग्रामपंचायतीचे नेतृत्व केलेल्या लिलाबाई भिल यांची स्वतःची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. त्या आजही



### निवाऱ्याचा अभाव ; मूलभूत सुविधांची कमतरता

अद्याप ठोस निर्णय न झाल्याने हा प्रश्न कायम प्रलंबित आहे. विशेष बाब म्हणजे, ग्रामपंचायतीचे नेतृत्व केलेल्या लिलाबाई भिल यांची स्वतःची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. त्या आजही झोपडीत वास्तव्यास असून पती आणि कुटुंबीयांसह नदी-नाल्यांमध्ये मासेमारी करून उदरनिर्वाह करतात. पावसाळ्यात झोपडीत पाणी गळणे, सुरक्षित निवाऱ्याचा अभाव आणि मूलभूत सुविधांची कमतरता अशा अनेक अडचणींना त्यांना सामोरे जावे लागत आहे.

झोपडीत वास्तव्यास असून पती आणि कुटुंबीयांसह नदी-नाल्यांमध्ये मासेमारी करून उदरनिर्वाह करतात. पावसाळ्यात झोपडीत पाणी गळणे, सुरक्षित निवाऱ्याचा अभाव आणि मूलभूत सुविधांची कमतरता अशा अनेक अडचणींना त्यांना सामोरे जावे लागत आहे.गावठाण जागेच्या मालकी हक्काच्या वादामुळे घरकुलासाठी पात्र असूनही लाभ मिळत नसल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. परिणामी, शासनाच्या महत्त्वाकांक्षी घरकुल योजनेचा लाभ अनेक आदिवासी कुटुंबांपर्यंत पोहोचलेला नाही. लिलाबाई भिल यांचे म्हणणे "आम्ही गेल्या तीस ते पस्तीस वर्षांपासून येथे राहत आहोत. आम्ही ज्या ठिकाणी वास्तव्यास आहोत ती जागा पिंपळगाव गावठाणात असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे येथील पात्र लाभार्थ्यांना कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ मिळालेला नाही. ही जागा वरखेड ग्रामपंचायतीकडे वर्ग करून सर्व पात्र कुटुंबांना घरकुल व इतर योजनांचा लाभ द्यावा. यासाठी तालुका आणि जिल्हास्तरावर अनेकदा पत्रव्यवहार केला असला तरी प्रशासनाने अद्याप दखल घेतलेली नाही," असे लिलाबाई भिल यांनी सांगितले. जगदीश शिरसाठ यांची मागणी तत्कालीन उपसरपंच जगदीश शिरसाठ यांनी सांगितले की, "या परिसरात अनुसूचित जाती-जमातीची अनेक कुटुंबे वास्तव्यास आहेत. संबंधित जागा पिंपळगाव गावठाणात जोडलेली असली तरी पिंपळगाव हे वरखेडपासून तीन ते चार किलोमीटर अंतरावर आहे. त्यामुळे ही जागा वरखेड ग्रामपंचायतीत समाविष्ट करून पात्र लाभार्थ्यांना घरकुल आणि इतर शासकीय योजनांचा लाभ द्यावा. यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असला तरी प्रशासनाकडून विलंब होत आहे

# जागतिक रक्तदाता दिनानिमित्त स्वयंस्फूर्त रक्तदानाचे आवाहन

## 'एक रक्तदान देईल अनेकांना जीवनदान'

जन सम्राट टाईम्स

**जळगाव । प्रतिनिधी** : १४ जून रोजी साजऱ्या होणाऱ्या जागतिक रक्तदाता दिनानिमित्त जिल्ह्यातील नागरिकांनी स्वयंस्फूर्तपणे रक्तदान करून गरजू रुग्णांना जीवनदान द्यावे, असे आवाहन शतकवीर रक्तदाता व रक्तदान जनजागृती कार्याचे ब्रॅण्ड ॲम्बेसेडर मुकुंद गोसावी यांनी केले आहे. "एक रक्तदान देईल अनेक गंभीर पीडितांना जीवनदान" हा संदेश देत त्यांनी समाजातील प्रत्येक सक्षम नागरिकाने या सामाजिक कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन पत्रकाद्वारे केले आहे. सध्या तप्त उन्हाळा आणि बदलत्या हवामानामुळे शहरासह जिल्ह्यातील अनेक रक्तपेढ्यांमध्ये रक्ताचा तुटवडा निर्माण झाला आहे. परिणामी, थॅलेसीमिया, हिमोफिलिया, सिकलसेल, रक्तक्षयग्रस्त रुग्ण, गर्भवती माता, प्रसूतीसाठी दाखल होणाऱ्या महिला, विविध शस्त्रक्रियांसाठी उपचार घेणारे रुग्ण तसेच अपघातग्रस्तांना वेळेवर रक्त उपलब्ध करून देणे मोठे आव्हान ठरत आहे. मुकुंद गोसावी यांनी सांगितले की, गंभीर रुग्णांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी नियमित रक्तसाठा उपलब्ध असणे



अत्यंत आवश्यक आहे. यासाठी रक्तदान शिबिरांचे आयोजन आणि स्वयंस्फूर्त रक्तदात्यांची संख्या वाढणे काळाची गरज बनली आहे. त्यांनी रक्तदानासंदर्भातील गैरसमज दूर करत स्पष्ट केले की, १८ वर्षांवरील आणि किमान ५० किलो वजन असलेली कोणतीही निरोगी व्यक्ती सहजपणे रक्तदान करू शकते.

आधुनिक तंत्रज्ञानामुळे एका रक्तदानातून विविध रक्तघटक तयार केले जातात. त्यामुळे एकाच व्यक्तीच्या रक्तदानातून अनेक रुग्णांना उपचारासाठी आवश्यक घटक उपलब्ध होऊन त्यांचे प्राण वाचवता येतात. रक्तदानानंतर विशेष आहाराची आवश्यकता नसून नेहमीचा नियमित आहार पुरेसा असतो. रक्तदानामुळे अशक्तपणा किंवा कमजोरी येत नाही. उलट शरीरात नवीन रक्तपेशींची निर्मिती वेगाने होत असल्याने आरोग्यावर कोणताही विपरीत परिणाम होत नसल्याचे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे, पोलिओमुळे ७० टक्के शारीरिक दिव्यांगत्व असतानाही मुकुंद गोसावी यांनी आपल्या सशक्त इच्छाशक्तीच्या बळावर जवळपास १०० हून अधिक वेळा रक्तदान करून समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे. "मला कोणताही त्रास होत नाही, उलट नेहमी उत्साही आणि प्रसन्न वाटते," असे त्यांनी नमूद केले. सामाजिक बांधिलकी जोपासणाऱ्या संस्था, स्वयंसेवी संघटना, विविध आस्थापना, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी रक्तदान शिबिरांचे आयोजन करून रक्तपेढ्यांना सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे. दरम्यान, १४ जून जागतिक रक्तदाता दिनानिमित्त मुकुंद गोसावी यांनी तयार केलेल्या रक्तदान जनजागृती गीताचे प्रकाशनही करण्यात येणार आहे. या गीताच्या माध्यमातून समाजात रक्तदानाविषयी अधिक जागरूकता निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. "आपल्या काही मिनिटांच्या रक्तदानातून अनेक गंभीर रुग्णांना नवजीवन मिळू शकते. त्यामुळे प्रत्येक सक्षम नागरिकाने रक्तदानासाठी पुढे यावे, हीच खरी मानवतेची सेवा आहे," असे आवाहन मुकुंद गोसावी यांनी केले आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

# सानवी गडेचे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत घवघवीत यश

## यावलकरांकडून कौतुकाचा वर्षाव

जन सम्राट टाईम्स

**यावल। प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ महामंडळ आयोजित सन २०२५-२६ च्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत बाल संस्कार विद्या मंदिर, यावल येथील इयत्ता सातवीची विद्यार्थिनी कु. सानवी पंकज गडे हिने तृतीय क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिच्या या कामगिरीमुळे शाळेसह यावल शहर आणि जळगाव जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.उत्कृष्ट वक्तृत्व कौशल्य, प्रभावी मांडणी, आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण आणि सातत्यपूर्ण मेहनतीच्या जोरावर सानवीने राज्यस्तरावर आपली वेगळी छाप पाडली. स्पर्धेतील तिच्या दमदार कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत असून ती अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरली आहे. सानवी ही प्रा. पंकज गडे यांची कन्या असून शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातही ती सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करत आहे. राज्यस्तरीय यशानंतर बाल संस्कार विद्या मंदिर परिवारात आनंदाचे वातावरण असून शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी तिचे अभिनंदन केले.या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष महेश वाणी, मुख्याध्यापक सुनील माळी, शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, तसेच नातेवाईक आणि यावल शहरातील विविध



सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी सानवीवर शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. विद्यार्थ्यांनी केवळ पाठ्यपुस्तकांपुरते मर्यादित न राहता वक्तृत्व, कला, संस्कृती आणि विविध स्पर्धात्मक उपक्रमांमध्येही सक्रिय सहभाग घ्यावा, याचे उत्तम उदाहरण सानवीच्या यशातून समोर आले आहे. तिच्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही राज्यस्तरावर झेप घेण्याची प्रेरणा मिळणार असल्याची भावना शिक्षकांनी व्यक्त केली.

### स्पर्धात्मक वाटचालीस विविध स्तरांतून शुभेच्छा

सानवी गडे हिच्या पुढील शैक्षणिक, सांस्कृतिक आणि स्पर्धात्मक वाटचालीस विविध स्तरांतून हार्दिक शुभेच्छा देण्यात येत असून भविष्यातही ती अशीच उल्लेखनीय कामगिरी करून यावल आणि जळगाव जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# ग्राहकांच्या न्याय हक्कासाठी लोककल्याण ग्राहक संरक्षण संस्थेचा पुढाकार

## सरकारी कार्यालये, जमीन व्यवहारांसह २४ प्रकारच्या ग्राहक तक्रारींवर मोफत मार्गदर्शन व पाठपुरावा

जन सम्राट टाईम्स

**मुंबई । प्रतिनिधी** : ग्राहकांच्या न्याय हक्कांचे संरक्षण, शोषणमुक्त आणि भ्रष्टाचारविरहित समाज निर्माण करण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या लोककल्याण ग्राहक संरक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य यांनी नागरिकांना विविध प्रकारच्या ग्राहक समस्यांबाबत पुढे येऊन तक्रारी नोंदविण्याचे आवाहन केले आहे. ग्राहक संरक्षण कायदा २०१९ अंतर्गत येणाऱ्या विविध विषयांवर संस्था मार्गदर्शन आणि आवश्यक पाठपुरावा करणार असल्याची माहिती संस्थेने प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. दादर (पश्चिम) येथील श्यामवाडी, रानडे रोड परिसरात मुख्य कार्यालय असलेल्या या संस्थेकडे रेशन दुकानांमधील सरकारी धान्य व रॉकेल वितरणातील गैरव्यवहार, घरगुती गॅस सेवा, चित्रपटगृहे, अवैध दारू विक्री, वजन-मापातील फसवणूक, मोबाईल खरेदी-विक्री व सेवा केंद्रांची निष्काळजीपणा, वीज वितरण कंपन्यांशी संबंधित तक्रारी, व्यापाऱ्यांकडून होणारी लूटमार, अन्नभेसळ तसेच अन्यायकारक



व्यापारी प्रथांबाबत तक्रारी स्वीकारल्या जात आहेत. याशिवाय औषध विक्रेत्यांकडून होणारी फसवणूक, फार्महाऊस किंवा खासगी घर-बंगल्यांशी संबंधित वाद, शाळा-महाविद्यालयांतील प्रवेश व देणगी शुल्क, वकिलांकडून न्यायालयीन कामातील निष्काळजीपणा, सरकारी व खासगी नोकरीतून काढून टाकण्याचे प्रकार, सोने-चांदी खरेदी-विक्री व्यवहार, रेल्वे, एसटी व ट्रॅव्हल्स सेवा, डॉक्टरांकडून होणारी सेवा त्रुटी, शेतकरी व बँकांशी संबंधित फसवणूक तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या गैरव्यवहारांबाबतही नागरिकांना तक्रार करता येणार आहे. जमीन खरेदी-विक्री, बिल्डरांकडून होणारी फसवणूक, म्हाडा, एसआरए आणि सरकारी जमिनीवरील सदनिकांशी संबंधित निष्काळजीपणाविरोधातही संस्था ग्राहकांच्या पाठीशी उभी राहणार असल्याचे सांगण्यात आले आहे. संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष दिनकर आमकर यांनी नागरिकांनी अन्याय सहन न करता कायदेशीर मार्गाचा अवलंब करून आपल्या हक्कांसाठी पुढे यावे, असे आवाहन केले आहे. तसेच राष्ट्रीय उपाध्यक्ष दिपक तांबे आणि संपर्क प्रमुख संतोष पाठक यांच्या माध्यमातून महाराष्ट्रासह उत्तर प्रदेशातील नागरिकांनाही मार्गदर्शन केले जाणार असल्याची माहिती देण्यात आली. ग्राहक संरक्षण कायदा २०१९ अंतर्गत येणाऱ्या सर्व प्रकारच्या विषयांमध्ये योग्य सल्ला, मार्गदर्शन आणि न्याय मिळवून देण्यासाठी संस्था कार्यरत असून, अधिकाधिक नागरिकांनी आपल्या समस्या संस्थेकडे मांडाव्यात, असे आवाहनही प्रसिद्धीपत्रकातून करण्यात आले आहे.

# मुलगा बहिणीला देण्यासाठी पतीचा तगादा, पतीनेच केली पत्नीची हत्या? कुटुंबीयांचा आरोप

जन सम्राट टाईम्स

**नरडाणा, धुळे। प्रतिनिधी** : मुलगा बहिणीला देण्यासाठी झालेल्या वादातून पतीनेच पत्नीची हत्या केल्याचा गंभीर आरोप पीडीत कुटुंबीयांनी केला आहे. नरडाण्यातील बेटावद येथे झालेल्या घटनेमुळे विवाहितेची आत्महत्या आहे की हत्या? याबाबतचा तपास नरडाणा पोलिसांनी सुरू केला आहे. मात्र तत्पूर्वी याप्रकरणी नरडाणा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. शव विच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतर विवाहितेची आत्महत्या की हत्या? हे स्पष्ट होणार आहे. मात्र शव विच्छेदन अहवाल येण्यापूर्वीच खाटीक कुटुंबियांनी पती नासिर खाटीक यानेच त्याच्या पत्नीची राहत्या घरात हत्या केल्याचा गंभीर आरोप केला आहे. त्यामुळे खाटीक याला तात्काळ अटक करून हत्येचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी पीडित कुटुंबीयांनी प्रसारमाध्यमांकडे केली आहे. यावेळी कुटुंबीयांना अश्रू अनावर झाले होते. बेटावद येथील फिरोज नूरमोहम्मद खाटीक यांची भाची असणाऱ्या 25 वर्षीय तमन्ना खाटीक हिचा जळगावच्या निंभोरा खिंडली येथील नासिर खाटीक



याच्याशी 2024 मध्ये विवाह झाला होता. विवाह झाल्यानंतर दोन महिन्यातच दोघेही पती-पत्नी बेटावद येथील मामाच्या गावाला राहायला आले होते. पुढे तमन्नाला मुलगा झाला होता. झालेला मुलगा बहिणीला द्यावा यासाठी दोघा पती-पत्नींमध्ये अनेक वेळा वाद देखील झाले होते. बहिणीला मुलगा नसल्याने नासिर खाटीक याने पत्नीकडे स्वतःचा मुलगा बहिणीला देण्यासाठी वारंवार तगादा लावत असल्याचा आरोप तमन्नाच्या कुटुंबीयांनी केला आहे. याच वादातून दोघा पती-पत्नीमध्ये 26 मे रोजी रात्रीच्या सुमारास वाद झाला. झालेल्या वादानंतर पतीनेच पत्नीची हत्या केल्याचा गंभीर आरोप खाटीक कुटुंबीयांनी केला आहे. पंचवीस वर्षीय तमन्नाच्या गळ्यावर दोरीचे निशाण असल्याने विविध चर्चांना उधाण आले आहे. पत्नीने आत्महत्या केल्याचं सांगत पतीच्या माहितीनुसार नरडाणा पोलिसात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# कल्याणेहोळमध्ये गुणवंत विद्यार्थी, अग्निवीरांचा सत्कार

## विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांबाबत मार्गदर्शन

जन सम्राट टाईम्स

**कल्याणे ।| प्रतिनिधी :** गावातील गुणवंत विद्यार्थी, विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करणारे युवक-युवती तसेच देशसेवेसाठी निवड झालेल्या तरुणांचा गौरव करण्यासाठी आयोजित करण्यात आलेला भव्य गुणवंत सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. नोबेल फाऊंडेशन, जळगाव, ग्रुप ग्रामपंचायत कल्याणेहोळ आणि विविध कार्यकारी सोसायटी, कल्याणेहोळ यांच्या संयुक्त विद्यमाने या प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गावातील पहिल्या महिला पोलीस बनण्याचा मान मिळविणाऱ्या भाग्यश्री समाधान पाटील यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच अग्निवीर पदासाठी निवड झालेल्या हर्षल बंडू पाटील आणि भरत सुरेश पाटील यांचाही मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. त्यांच्या यशामुळे गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. यासोबतच इयत्ता दहावी आणि बारावीच्या बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा त्यांच्या आई-वडिलांसह सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करून त्यांना पुढील वाटचालीसाठी प्रोत्साहन देण्यात आले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जीपीएस फाऊंडेशन, पाळधीचे प्रतापराव गुलाबराव पाटील उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून धरणगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुनील पवार,



सामाजिक कार्यकर्ते रमेश राजाराम पाटील, सरपंच रणजित पाटील, सोपान पाटील तसेच ग्लोबल मिशन स्कूल, बाहुटेचे संचालक व उद्योजक मनोहर पाटील आणि शिक्षक राहुल पाटील उपस्थित होते. मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती, स्पर्धा परीक्षांचे महत्त्व, करिअर नियोजन, मुला-मुलींची सुरक्षितता आणि सामाजिक जबाबदारी याविषयी सखोल मार्गदर्शन केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून चिकाटी, मेहनत आणि सातत्याच्या बळावर यश संपादन करावे, असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयदीप पाटील यांनी केले, तर प्रास्ताविक रमेश राजाराम पाटील यांनी केले. समाधान पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोंजनासाठी पोलीस पाटील दीपक ऊखर्डू पाटील, ग्रामपंचायत सदस्य, विविध कार्यकारी सोसायटीचे पदाधिकारी तसेच ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले. गावातील गुणवंतांचा गौरव करून नव्या पिढीला प्रेरणा देणाऱ्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, मोठ्या संख्येने उपस्थित पालक व विद्यार्थ्यांनी अशा कार्यक्रमांचे नियमित आयोजन करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# धक्कादायक! मध्यरात्री जमीन खोदून केबल वायर चोरी

## देवपूर पोलिसांची धडाकेबाज कारवाई; दोन पिकअप वाहनांसह साडेनऊ लाखांचा मुद्देमाल जप्त

जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी:** धुळे शहरातील मध्यरात्री जमीन खोदून केबल वायर चोरी करणाऱ्या परजिल्ह्यातील टोळीचा देवपूर पोलिसांनी पर्दाफाश करत हिंगोली व परभणी येथील सहा आरोपींना अटक केली आहे. या कारवाईत दोन पिकअप वाहनांसह सुमारे ९ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून आरोपींना न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात व्यक्ती जमीन



खोदून भूमिगत केबल वायर चोरी करत असल्याची माहिती देवपूर पोलिसांना मिळाली होती.त्यानुसार पोलिसांनी तातडीने सापळा रचत अंडाकृती बगीचा आणि प्रभात नगर परिसरात संशयित वाहनांची तपासणी केली. या कारवाईत दोन पिकअप वाहनांसह सहा जणांना ताब्यात घेण्यात आले. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये करण भादूर शिंदे (वय २६, रा. हिंगोली), अर्जुन म्हसु शिंदे (वय १९, रा. हिंगोली), सागर रमेश शिंदे (वय १८, रा. हिंगोली), कृष्णा काशिनाथ कुवर (वय ३४, रा. बुरझड, जि. धुळे), किशन देशिंग शिंदे (वय ३७, रा. हिंगोली) आणि सतीश मारुती धोतरे (वय २९, रा. परभणी) यांचा समावेश आहे. पोलिसांनी आरोपींकडून चोरीसाठी वापरण्यात आलेली दोन पिकअप वाहने तसेच केबल वायरसह एकूण ९ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपींना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. या टोळीने धुळे जिल्ह्यासह इतर ठिकाणीही अशाच प्रकारच्या केबल चोरीच्या घटना घडवल्या आहेत का, याचा तपास देवपूर पोलीस करत आहेत. आरोपींकडून महत्त्वाची माहिती मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ही उल्लेखनीय कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी राजकुमार उपासे यांच्या मार्गदर्शनाखाली देवपूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक समाधान वाघ यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

### 9 लाख 50 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

कारवाईत पोलीस उपनिरीक्षक गणेश आघाव यांच्यासह पोलीस अंमलदार मिलिंद सोनवणे, महेंद्र भदाणे, बटेन्द्र पाटील, राहुल गुंजाळ, राजेश हिरे, वसंत कोकणी, शुभम बोरसे, नितीन चव्हाण, सौरभ कुठे, शेखर देशमुख आणि प्रवीण खैरनार यांनी सहभाग घेतला. देवपूर पोलिसांच्या सतर्कतेमुळे मध्यरात्री केबल चोरी करणाऱ्या टोळीला जेरबंद करण्यात यश आले असून, या कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे. या कारवाईत दोन पिकअप वाहनांसह सुमारे ९ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून आरोपींना न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.